नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## शासनाला बनावट औषधीचा पुरवठा करणा—या टोळीतील एका आरोपीस उत्तरप्रदेश सहारनपुर येथुन अटक

खोटे सी ओ ए. व जि.एम.पी. प्रमाणपत्र सादर करून त्याद्वारे जिल्हा शल्य चिकित्सक नागपुर यांचेकडुन ई टेन्डरींग मिळवुन Recip-500 tablets या बनावट औषधीचा पुरवठा केल्याप्रकरणी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे गुन्हा नोंद असुन तपासात आहे.

सदर गुन्हयातील आरोपी विजय विजय शैलेन्द्र चौधरी रा फ्लॅट नं १९०७, बिल्डींग नं ०८ पुनम क्लस्टर २, शांतीनगर, मिरा रोड, याचा मा जिल्हा व सत्र न्यायालय नागपुर तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपुर येथुन जामीन नामंजुर झाल्याने त्यास ताब्यात घेवुन अटक करण्यात आले. गुन्हयाच्या तपासादरम्यान बनावट औषधीचा खरेदीबाबत सहारनपुर उत्तरप्रदेश येथे राहणारे रॉबीन उर्फ हीमांशु तनेजा व त्याचा भाउ रमन तनेजा यांचेशी संबंध असल्याचे निष्पन्न झाल्याने दोन्ही आरोपींना पकडण्याकरीता पथक सहारनपुर उत्तरप्रदेश येथे पाठविण्यात आला असता पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आरोपी रमन विजयकुमार तनेजा रा लक्ष्मणपुरम जनता रोड सहारनपुर उत्तरप्रदेश हा त्याचे घरून पळुन जात असता मोठ्या शिताफीने त्यास पकडुन कळमेश्वर येथे आणले. आरोपी रॉबीन उर्फ हीमांशु तनेजा हा फरार असुन गुन्हयाचे प्रथमदर्शनी तपासात आरोपीमध्ये बनावट औषधीचे खरेदी विक्रीचे करोडो रूपयांचा व्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले असुन बनावट औषधीचे उत्पादन उत्तराखंड राज्यातील देहरादुन परीसरात झाले असल्याची माहीती मिळाली असुन त्याबाबत तपास सुरू आहे. तसेच गुन्हयामध्ये याव्यतिरीक्त त्याचा परीसरातील आणखी आरोपींचा गुन्हयात सहभाग असण्याची शक्यता आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली श्री अनिल म्हस्के (भापोसे) सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, सपोनि आशिषसिंह ठाकुर, पोउपनि दत्तात्रय कोलटे, पोना सतिश राठोड सायबर सेल, पोशि मनिश सोनोन, पोशि नितेश पुसार यांनी केलेली आहे.

## वाहनाचे नंबर प्लेट बदलवुन अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

## पोलीस स्टेशन भिवापूरची कार्यवाही

दिनांक २९/०६/२०२४ चे २०.०८ वा. दरम्यान पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोस्टे भिवापूर हद्दीतील मौजा जावराबोडी शिवार येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची टिप्पर व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून मौजा जावराबोडी येथे पोलिस स्टाफ यांनी नाकाबंदी करून टिप्पर क्र. एम एच– ४०/बीएल ६१०१ चा चालक आरोपी नामे – लोकेश दयाराम देशमुख वय २५ वर्ष २. क्लिनर विक्रांत चक्रधारी बुकावन वय २४ वर्ष दोन्ही रा सिंधपुरी तह पवनी जि भंडारा याने आपल्या वाहनात ०६ ब्रास रेती *मालक नामे*– ३) वासुदेव रमेश बुकावन वय ३६ वर्ष रा बायपास रोड उमरेड जि नागपूर याचे सांगणे वरून आरोपीतांनी संगणमत करून आपले टिप्पर १) टिप्पर कं. एम एच ४०/बीएल ६१०१ला दुस–या क्रमांकाची नंबर प्लेट लावुन फसवणुक करून बनावटी परवाना तयार करून दुस–या टिप्परच्या क्रमांकाची रॉयल्टी ठेवुन अवैधरित्या विनापरवाना टिप्परमध्ये आपले आर्थिक फायद्याकरीता शासनाचा महसुल बुडवुन रेती वाळुन भरून मालमत्तेचे नुकसान करून रेतीची चोरटी वाहतुन करतांना मिळुन आल्याने नमुद टिप्परमध्ये त्यामध्ये ६ ब्रास रेती कि. ३०,०००/– रू. तसेच टिप्पर कं. एम एच ४०बीएल ६१०१ किंमती २०,००,०००/– रू असा एकूण २०,३०,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, ४२०, ४६८,१०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७,)४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१,०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास पोहवा प्रफुल माहुरे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल व त्यांचे स्टाफनी पार पाडली,

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**